REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ


वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख ३ ऑगस्ट, १९३८ | अंक ३१


# किर्लोस्कर



**२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा।

**किर्लोस्कर बंधु, लि. : किर्लोस्करवाडी, सातारा**



**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोपाक प्रिंटिंग, जरीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.



**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशिकच्या **सह्याद्रि** विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच समर्थन आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणी पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | **मॅनेजिंग डायरेक्टर**

# विविध माहिती

### वार्षिक सभा

पुणें पोस्ट्स्, आर. एम. एस. ॲन्ड टेलिग्राफस को. अर्बन बँक लि. ची वार्षिक साधारण सभा पुणें हेड पोस्ट ऑफिसचे इमारतींत रविवार ता. १४ ऑगस्ट १९३८ रोजीं दुपारीं ३ वाजतां भरणार आहे.

### फ्रेंच भूमीवर जर्मनीचा डोळा

जर्मनी आणि फ्रान्स ह्यांच्या सरहद्दीवरून -हाइन नदी वहाते. नदीच्या जर्मनीकडील तीरावर सुमारें एक हजार एकर जमीन आज शंभर वर्षें फ्रेंच नागरिकांचे मालकींत आहे, ती त्यांचेकडून काढून घेण्याचा जर्मन सरकारचा यत्न चालू आहे.

### क्षयरोगनिवारण फंड

लेडी लिनलिथगो ह्यांनीं सुरु केलेल्या क्षयरोगनिवारण फंडाची रकम ४८ लक्ष रुपयांवर गेली आहे.

### सिमेंटचा खप

हिंदुस्थानांत खपणाऱ्या एकूण सिमेंटपैकीं शेकडा चाळीस टक्के सिमेंट प्रमुख बंदरांतच खपतें. हिंदुस्थानांत सिमेंटचा उठाव झपाट्यानें वाढत आहे. १९३७-३८ मध्यें एकूण १३½ लक्ष टन सिमेंटचा खप ह्या देशांत झाला, म्हणजे दर माणशी खपाचें प्रमाण ८ पौंड इतकें पडलें. अमेरिकेंत हें प्रमाण ५५८ पौंड पडतें.

### दशमानपद्धती

जगांतील सर्व प्रमुख राष्ट्रांनीं चलनें आणि वजन-मापें ह्यांचे बाबतींत दशमानपद्धति अंमलांत आणली आहे. त्यामुळें कोष्टकें अत्यंत सोपीं होऊन हिशेबाचें कामहि सुलभ होतें. ग्रेट-ब्रिटन मात्र आपल्या जुन्या कोष्टकांस अद्याप चिकटून आहे. त्या देशांत दशमानपद्धति सुरु व्हावी, अशी तेथील शास्त्रज्ञांची आणि व्यापाऱ्यांची इच्छा असली तरी त्या संबंधांत लोकमत पुरेसें जागृत नाहीं. लिऑन्स आणि कंपनी ह्या सुप्रसिद्ध व्यापारी कंपनीनें आपले हिशेब दशमानपद्धतीनें मांडण्यास प्रारंभ केला आहे.

### जळगांव येथें कॉटन मार्केट

जळगांव येथें कॉटन मार्केटाची स्थापना नुकतीच झाली आहे. मार्केटांत येणाऱ्या प्रत्येक गाडीकडून दोन आणे पट्टी घेण्यांत येईल. व्यापारी आणि एजंट्स ह्यांस परवाने देण्यांत येतील, त्यांपासून आणि वरील पट्टीपासून मिळून सुमारे २,२५० रुपये उत्पन्न होऊन त्यांतून खर्च भागेल.

### क्लिअरिंग हौसमधील चेक्सची देवघेव

मुंबई येथील क्लिअरिंग हौसमध्यें जुलै २२ अखेर संपलेल्या आठवड्यांत १७ कोटि, १९ लक्ष रुपये किंमतीच्या ९५,९३१ चेक्सची देवघेव झाली.

### जॉर्ज न्यून्स लि.

साप्ताहिकें व मासिकें काढण्याचा धंदा करणारी जॉर्ज न्यून्स लि. ही ब्रिटिश कंपनी सुप्रसिद्ध आहे. सुमारें ५० नियतकालिकें तिचे नियंत्रणाखालीं आहेत. गेल्या वर्षाच्या व्यवहारांत तिला २५ लक्ष रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस १० टक्के डिव्हिडंड मिळालें.

### जुलै महिन्याचा क्रांतिकारक योग

अनेक राष्ट्रांत जुलै महिन्यांत प्रचंड राजकीय घडामोडी झालेल्या आहेत. त्या महिन्यांत नुकतेच बावीस निरनिराळ्या देशांत राजकीय क्रांत्यांचें स्मारक असे स्वातंत्र्य महोत्सव साजरे करण्यांत आले. अमेरिका,फ्रान्स, स्पेन, तुर्कस्तान, जर्मनी इत्यादि देशांचा या यादींत समावेश होतो. राजकीय उलथापालथी आणि जुलै महिना ह्यांचा संबंध एका लेखकानें निदर्शनास आणला आहे. दुसऱ्या एखाद्या महिन्याचा असाच योग दाखवतां येणार नाहीं काय?

### हिंदी रेल्वेजचा नफा

हिंदी रेलवेजचे १९३७-३८ सालाविषयक हिशेब पुरे झाले आहेत, त्यांवरून रेलवेजना ह्या वर्षी २¾ कोटि नफा झाला असल्याचें दिसून येतें. १९३६-३७ सालीं १¾ कोटि रुपये नफा झाला होता.

### हिंदी बनावटीच्या मोटारी स्वस्त पडणार!

हिंदुस्थानांत तयार केलेली मध्यम दर्जाची मोटार १,५०० रुपयांस मिळूं शकेल, असें मद्रास प्रांताचे एक मंत्री, श्री. गिरी, ह्यांनीं आपल्या एका भाषणांत सांगितलें. अशा प्रकारच्या मोटारीस सध्या ३,००० रुपये पडतात. हिंदुस्थानांत मोटारींचें उत्पादन यशस्वी रीतीनें करतां येईल, असा श्री. गिरी ह्यांस विश्वास वाटत असून त्या दृष्टीनें ते प्रयत्न करीत आहेत.

### त्रावणकोर बँकेकडे वसुलीसाठी दिलेलीं बिलें

"त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँकेच्या लिक्विडेटरांनीं बँकेकडे येणें असलेल्या रकमा वसूल करण्यास प्रारंभ केला आहे. बँकेच्या नांवानें वसुलीसाठी लिहून दिलेलीं कित्येक बिलें लिक्विडेटर्स सरकारी तिजोऱ्यांस सादर करीत आहेत. बँकेनें आपला कारभार बंद केलेला आहे. तेव्हां अशा बिलांच्या रकमेवर मालकी कोणाची आहे हें योग्य त्या कोर्टांत शाबीत झाल्याविना बिलांची रकम देण्यांत येऊं नये. ज्यांनीं सरकारकडून येणें असलेल्या रकमांबाबतचीं बिलें बँकेस वसुलीसाठी दिलीं असतील, त्यांनीं त्या बिलांसंबंधांत योग्य तो सल्ला घेऊन इष्ट ती व्यवस्था करावी" अशा आशयाचें जाहीर पत्रक मद्रास प्रांतिक सरकारनें काढलें आहे.

### दर बारा मिनिटांगणिक घंटा

बर्लिन शहरांतील सर्वांत अधिक रहदारीच्या ठिकाणीं एक घंटा लावण्यांत आली आहे. दर बारा मिनिटांनीं ती एकदां वाजविण्यांत येते. प्रत्येक तासास जर्मनीमध्यें पांच अर्भकें जन्मतात, ह्या गोष्टीचें तें निदर्शक आहे. लोकसंख्या वाढविण्याच्या प्रचाराचा हा एक मनोरंजक प्रकार आहे.

### टाटा सन्स लि. चे नवे अध्यक्ष

टाटा सन्स लि. चे चेअरमन सर नौरोजी सकलतवाला हे नुकतेच मरण पावले. त्यांचे जागीं मि. जे. आर. डी. टाटा ह्यांची नेमणूक झाली आहे. त्यांचें वय केवळ ३४ वर्षांचें आहे, परंतु त्यांनीं औद्योगिक व्यवहारांचा चांगला अनुभव मिळवला आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| १७-७-३८ ते २३-७-३८ | ४६,००,६३७ |
| २४-७-३८ ते ३०-७-३८ | ५४,६१,१८७ |
| २१-९-३१ ते ३०-७-३८ | ३,१७,७८,२०,५४६ |

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३७४ |
| २ पुस्तक विक्रीचा धंदा | ३७५ |
| ३ औद्योगिक वांधे मिटविण्याची योजना ... | ३७६ |
| ४ सहकारी बँकेची येती परिषद ... ... | ३७७ |
| ५ स्फुट विचार... ... | ३७७ |
| हिंदी कापडाच्या गिरण्यांत विदेशी कपाशीचा खप—लोकसंख्या वाढविण्याचे पद्धतशीर प्रयत्न-खाण्याच्या पदार्थांत भेसळ—म्हैसूर संस्थानांतील सहकारी चळवळ—औषधें पुरविणारी ब्रिटिश कंपनी. | |
| ६ समाज-जीवन आणि राष्ट्रीय शिक्षण ... | ३७८ |
| ७ ग्रेट ब्रिटनचा सुवर्णनिधी | ३७९ |
| ८ गव्हाच्या पोत्यांचा प्रसार | २८० |
| ९ औंध सं. म. बँकेची नवीन शाखा ... | ३८० |
| १० क्षीरापकर टेलरिंग ॲन्ड कटिंग कॉलेज ... | ३८१ |
| ११ कस्टम्सच्या उत्पनांत घट | ३८१ |
| १२ सहकारी चळवळ ... | ३८२ |
| १३ निवडक बाजारभाव | ३८३ |

# अर्थ

बुधवार, ता. ३ ऑगस्ट, १९३८

## पुस्तक-विक्रीचा धंदा

हिंदुस्थानांत पुस्तक-विक्रीचा धंदा अत्यंत असंघटित असा आहे. वाटेल त्यानें पुस्तकांचें दुकान काढावें आणि इतर दुकानांशीं पुस्तकांचे किंमतीचे बाबतींत अनियंत्रित स्पर्धा करावी, अशी येथें परिस्थिति आहे. गिऱ्हाइकांस पुस्तक कोणत्या किंमतीस विकावें ह्याविषयीं दुकानदारावर कोणत्याहि प्रकारचें बंधन नाहीं. त्यामुळें कमिशनची पद्धत सर्रास रूढ झाली असून, त्यांतहि एकवाक्यता नसल्यानें पुस्तकविक्रीच्या धंद्यांत पद्धतशीरपणाचा पूर्ण अभाव आहे. इंग्लंडमधील पुस्तक विक्रीचा धंदा त्या मानानें सुसंघटित असला, तरी तेथेंहि सुधारणेस अद्याप पुष्कळच वाव आहे, असें दिसतें. ह्या धंद्याची हिंदुस्थानांत संघटना कोणत्या प्रकारानें करतां येणें शक्य आहे, हें समजण्यास इंग्लंडमधील त्या संबंधांतल्या परिस्थितीची माहिती उपयुक्त होईल.

प्रकाशकानें ठरविलेल्या किंमतीसच दुकानदारानें पुस्तक विकलें पाहिजे, असा इंग्लंडमध्यें नियम आहे. गिऱ्हाइकानें पुस्तक पोस्टानें मागविल्यास, टपालखर्च गिऱ्हाइकानें भरावा लागतो. प्रकाशकांचा "पब्लिशर्स असोसिएशन ऑफ ग्रेट ब्रिटन ॲन्ड आयर्लंड" ह्या नांवाचा संघ आहे, त्याचे १२० सभासद आहेत. पुस्तक विक्रेत्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करणारी दुसरी एक संस्था आहे, तिचे १,४०० सभासद आहेत. ह्या दोन्ही संस्थांच्या सभासदांमधील परस्पर करारानें, पुस्तक त्यावर छापलेल्या किंमतीपेक्षा कमी किंमतीस विकणें हें नियमबाह्य ठरविलेलें आहे. इतर प्रकाशक आणि दुकानदार हेहि वरील नियम पाळतात.

प्रकाशकांच्या संस्थेच्या एखाद्या सभासदानें प्रसिद्ध केलेलें पुस्तक संस्थेस संमत असलेल्या ठराविक दुकानदारांसच फक्त सवलतीच्या दरानें मिळूं शकतें. अर्थातच इतर दुकानदारांस तें विक्रीस ठेवतां येत नाहीं. संमत दुकानदारांचे यादींत आपलें नांव यावें, अशी एखाद्या दुकानदाराची इच्छा असल्यास, त्यास त्याप्रमाणें अर्ज करावा लागतो. ह्या अर्जाची तपासणी पब्लिशर्स असोसिएशन आणि असोसिएटेड बुकसेलर्स (पुस्तक-विक्रेत्यांची संस्था) ह्यांच्या संयुक्त कमिटीमार्फत होते आणि अर्जदाराचें नांव मंजूर झालें, तरच त्यास सवलतीच्या दरानें पुस्तकें मिळूं शकतात. आपलें दुकान हमरस्त्यावर असून पुस्तकांचा विवक्षित किमान संग्रह ठेवण्याचा आपला विचार आहे, हें अर्जदारानें कमिटीस पटवून द्यावें लागतें. जोडधंदा म्हणून पुस्तकें विकणारांस ह्या धंद्यांत स्थान मिळणें अशा रीतीनें अशक्य होतें. प्रकाशकांनीं दुकानदारांस किती कमिशन द्यावें, ह्याविषयीं मात्र निश्चित नियम नाहीं.

ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल सुमारें १६ हजार ग्रंथ प्रसिद्ध होतात. प्रत्येक ग्रंथाच्या २ हजार प्रती खपतात ह्या हिशेबानें दर वर्षी ३ कोटि, २० लक्ष पुस्तकांची विक्री होते, असा अंदाज झाला. म्हणजे, प्रत्येक पुस्तकाची सरासरी किंमत २½ शिलिंग धरल्यास एकूण उलाढाल ४० लक्ष पौंडांची म्हणजे सुमारें ५⅓ कोटि रुपयांची होते. १,४०० दुकानदारांत ह्याची वांटणी केली, म्हणजे प्रत्येकाच्या व्यवहाराची सरासरी ५० हजार रुपये येते. दुकानदाराचा स्वतःचा पगार, जागेचें भाडें आणि नोकरांचें वेतन ह्यासाठी प्रत्येक दुकानास सालिना ८ हजार रुपये खर्च येतो. एवढीच रकम मिळवावयाची जरी म्हटलें, तर प्रत्येक दुकानाची विक्री किमान ३२ हजार रुपयांची तरी पाहिजे. कित्येक दुकानदारांचा व्यवहार प्रचंड प्रमाणावर चालतो, हें लक्षांत घेतलें म्हणजे सामान्य प्रतीच्या दुकानदारास तोंडमिळवणी करणें कसें कठीण जात असेल, ह्याची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील दर माणशी उत्पन्नाचा हिशेब करतांना श्रीमान लक्षाधीशांच्या उत्पन्नाचाहि एकूण मिळकतींत अंतर्भाव झालेला असल्यामुळें, येणारा सरासरी उत्पन्नाचा आकडा बहुसंख्य गरीब प्रजेचा उत्पन्नापेक्षा मोठा असतो, तद्वतच वरील प्रकार आहे.

गिऱ्हाइकांचें मन पुस्तक-खरेदीकडे कसें वळलें, हें उमजण्यासाठी कांहीं प्रकाशकांनीं आकडे जमा केले, त्यांवरून असें दिसतें कीं इंग्लंडमध्यें पुस्तकांच्या खपाचीं (१) त्यांवरील अभिप्राय, (२) त्यांसंबंधीं जाहिराती आणि (३) त्यांची मित्रांकडून प्रशंसा, हीं तीन प्रमुख कारणें आहेत. दुकानदारानें केवळ सांगितल्यावरून फारच थोडीं पुस्तकें खपतात. प्रकाशकांनीं एकमेकांशीं सहकार्य करून आपल्या पुस्तकांचा उठाव करण्याचें काम पद्धतशीरपणें चालविलें तर पुस्तक विक्रीचें काम सुलभ होऊन गिऱ्हाइकांचीहि सोय होईल, हें उघड आहे. हिंदुस्थानांत नामवंत लेखकांसहि प्रकाशनाची जबाबदारी स्वतःचे अंगावर घेण्याची पाळी येते, ह्याचें कारण पुस्तक प्रकाशनाचा धंदा किफायतशीर नाहीं, हेंच होय. शैक्षणिक प्रगति आणि लोकांची ऐपत ह्या गोष्टी पुस्तकांचे धंद्याचें दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत.

---

### कपास पिकवण्याची इटलीची धडपड

आपल्या राष्ट्राच्या कारखान्यांस लागणाऱ्या कपाशीचा पुरवठा इटालिअन साम्राज्यांतून व्हावा ह्यासाठी मुसोलिनीची धडपड चालली आहे. कपाशीची पैदास करण्यासाठी कंपन्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. हे सर्व प्रयत्न यशस्वी झाले तरी एकूण मागणीचा एक दशांश हिस्साहि इटलीस स्वतः पुरवतां येणार नाहीं आणि बाकीची कपास परदेशांकडूनच घ्यावी लागेल.

## औद्योगिक कामगारांचे वांधे मिटविण्याची योजना

### मुंबई सरकारचें नवें बिल

मुंबई प्रांतांतील औद्योगिक कामगारांचे वांधे तडजोडीनें आणि सामोपचारानें तातडीनें मिटविण्याची योजना मुंबई सरकारच्या नवीन नियोजित बिलांत अंतर्भूत आहे. कोणत्याहि कारखानदारास ह्यापुढें आपल्या कामगारांच्या कामाच्या तासांचे अगर वेतनाचे बाबतींत मनाप्रमाणें वाटेल तेव्हां फेरफार करतां येणार नाहींत; त्यासंबंधीं सरकारास आणि कामगारांच्या प्रातिनिधिक संस्थांस आगाऊ माहिती द्यावी लागेल. सुचविलेला फरक उभय पक्षांस मान्य असेल, तर त्याप्रमाणें रजिस्ट्रारकडे रीतसर नोंद करावी लागेल. दोघांची एकवाक्यता झाली नाहीं तर वांधा उपस्थित होईल आणि सरकारी तडजोड-अधिकारी मध्यें पडून तडजोड घडवून आणण्याचा यत्न करील. त्याचे परिश्रम व्यर्थ ठरल्यास अगर सरकारच्या इच्छेनुसार तडजोड बोर्ड नेमण्यांत येईल. ह्याचप्रमाणें, कामगारांसहि वेतनांत अगर इतर बाबतींत सुधारणा पाहिजे असल्यास त्यांनींहि वरप्रमाणेंच दाद लावून घेतली पाहिजे. तडजोडीचीं बोलणीं चालू असेपर्यंत कारखानदारांस कारखाना बंद करतां येणार नाहीं आणि कामगारांसहि संप पुकारतां येणार नाहीं. रोजच्या कामासंबंधाच्या नियमांचा अभाव, हेंच संपाचें अनेक वेळां मूळ कारण असलेलें आढळतें. बिलांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें सर्व कारखानदारांनीं असे नियम तयार केले पाहिजेत. हे नियम कमिशनर ऑफ लेबरनीं मान्य केल्यावर आणि रजिस्ट्रारकडे नोंदल्यावर बारा महिने अंमलांत राहतील आणि ते कारखानदार व कामगार ह्या दोघांसहि बंधनकारक होतील.

कमिशनर ऑफ लेबरच्या हुकुमावर कोर्ट ऑफ इंडस्ट्रिअल आर्बिट्रेशनकडे अपील करतां येईल. ह्या कोर्टाकडे निवाड्यासाठी दोन्ही पक्षांस जातां येईल आणि कोर्टाचा निवाडा अखेरचा आणि बंधनकारक होईल. ह्या कोर्टावर दोन किंवा अधिक सभासद नेमले जातील आणि त्यांची लायकी हायकोर्ट जज्जाच्या लायकी इतकी असेल. आर्बिट्रेशनच्या निवाड्यांचीं अपिलें ह्या कोर्टापुढें चालतील आणि संप अगर कारखाना-बंदी कायदेशीर अगर बेकायदा आहे हेंहि वरील कोर्ट ठरवील.

कारखानदार आणि कामगार ह्यांस आपले वांधे इतर लवादामार्फतहि मिटवून घेण्याची सोय बिलानें केली आहे. इंडस्ट्रिअल कोर्ट अगर दुसरा एकादा लवाद ह्यांकरवीं त्यांनीं आपल्या वांध्याचा निकाल लावून घेतला म्हणजे तो रजिस्ट्रारकडे नोंदला जाईल. कामगार संघांची नोंदणी करणें आणि त्या बाबतची पूर्व चौकशी करणें हें महत्वाचें काम रजिस्ट्रारकडे सोंपविलेलें आहे. मुंबई प्रांताचे गट पाडण्यांत येऊन प्रत्येक गटांतील एका प्रकारच्या धंद्याबाबत एकच यूनियन सरकारास मान्य होईल. जेथें नोंदलेले कामगार संघ नाहींत, तेथें कांहीं अटींवर अशाच प्रकारच्या इतर संघांसहि मान्यता दिली जाईल. मात्र त्या विवक्षित गटांतील उद्योगधंद्यांत गुंतलेल्या एकूण कामगारांपैकीं कांहीं किमान कामगार त्या संघांत सामील झाले असले पाहिजे.

---

## सहकारी बँकांची येती परिषद्

### चर्चेचे विषय

मुंबई इलाखा सहकारी बँकांची येती परिषद् ता. २७ आणि २८ ऑगस्ट रोजीं मुंबइ येथें भरणार आहे. परिषदेच्या स्टँडिंग कमिटीनें परिषदेपुढें येणाऱ्या विषयांचे पांच गट केले आहेत. ह्या पांची गटांतील विषयांचा विचार स्वतंत्र उपसमित्यांकडे सोंपवून, त्यांवरील ठरावांचे मसुदे त्यांस तयार करण्यास सांगण्याचें स्टँडिंग कमिटीनें योजिलें आहे. ह्या उपसमित्यांची नेमणूक परिषदेच्या पहिल्या दिवशीं होईल. कामाची वांटणी पुढीलप्रमाणें करण्याचा विचार आहे:—

उपसमिती नं. १:—सेंट्रल बँकांचे व्यवहार आणि बँकिंग यूनियन्सची स्थापन ह्या बाबत रीऑर्गनायझेशन कमिटीच्या सूचना-

उपसमिती नं. २:--अर्बन बँका आणि सोसायट्या यांचे व्यवहार आणि "बँक" ह्या शब्दाच्या उपयोगावर बंधनें, ह्याबाबत रीऑर्गनायझेशन कमिटीच्या सुचना.

उपसमिती नं.३:---हिंदी कंपनी कायद्यांतील कांहीं कलमें सहकारी बँकांस लागू करण्याची इष्टानिष्टता; स्टँप ड्यूटी आणि रजिस्ट्रेशन फी ह्यांची कांहीं व्यवहारांचे बाबत माफी काढून घेण्याची सूचना; सहकारी बँकांत मतनोंदणीची बॅलट पद्धत अंमलांत आणण्याची आवश्यकता; पुणें शहरासारख्या प्रमुख शहरांत इक्विटेबल मॉर्गेजच्या पद्धतीचा स्वीकार करण्यास प्रारंभ.

उपसमिती नं. ४:---सेंट्रल आणि अर्बन बँका ह्यांस जोडणारा दुवा, ह्या दृष्टीनें उपयोगी पडणाऱ्या संस्थेची स्थापना; कांहीं विशिष्ट प्रकारच्या बँकांकरितां धंदेवाइक हिशेबनिसांची रजिस्ट्रारमार्फत नेमणूक; ऑडिट फेडरेशन्सची स्थापना; लँड मॉर्गेज बँकांनीं परिषदेचे सभासद होण्यास मान्यता; परिषदेचे कार्यक्षेत्रांतून सिंध प्रांत वगळणें.

उपसमिति नं. ५:---अंतर्गत चेक्स व बिल्स ह्यांच्यां वसुलीबाबत दुरुस्त योजना.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें
द. म. द. शें. ०४चार आणे व्याजानें
व
अनुक्रमानें रु. १०० ते २०००
देण्याची नवीन योजना. लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा. त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं
०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या
एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षें मुदतीच्या
ठेवी घेणें आहेत
व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतवणें आहे तें लिहावें.
आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.

पुणें

गेस्ट हाऊस
पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.
हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

# स्फुट विचार

## हिंदी कापडाच्या गिरण्यांत विदेशी कपाशीचा खप

हिंदुस्थानांत कपास एवढ्या मोठ्या प्रमाणावर पिकत असतां, हिंदी कपाशीस परदेशांत बाजारपेठ मिळण्याचें दूर राहून विदेशी कपाशीची आयात वाढत असावी, हें चमत्कारिक नाहीं काय? कपास कापडाच्या देशी गिरण्या तलम कापडाचें उत्पादन करून परदेशी कापडाशी यशस्वी रीतीनें टक्कर देऊं लागल्या आहेत; तथापि, ह्या कापडास लागणारा लांब धाग्याचा कापूस त्यांस परदेशांतून आणावा लागतो. १९३८ च्या पहिल्या तिमाहींत जितक्या किंमतीची हिंदी कपास निर्गत झाली, तीपेक्षां आयात कपाशीची किंमत एक लक्ष रुपयांनीं अधिक भरली. अशा रीतीनें हिंदी कपाशीस खुद्द स्वदेशी गिरण्यांत वाव मिळेनासा झाला असून विदेशी कपाशीनें आक्रमण करण्यास प्रारंभ केला आहे. कपास कापडाच्या गिरण्यांचे प्रगतीचे दृष्टीनें, त्या कोणती कपास वापरतात हा प्रश्न गौण स्वरूपाचा असला, तरी हिंदी कपाशीच्या उत्पादनाचे आणि उठावाचे दृष्टीनें तो प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. हिंदी गिरण्यांतहि तिला वाव मिळाला नाहीं, तर बाहेर तिला कोण पुसणार? हिंदी कापडाची निर्गत मोठ्या प्रमाणावर चालत असून कपाशीच्या बदली कापड असा विनिमय होत असता, तर विदेशी कपाशीची आयात थोडी तरी समर्थनीय म्हणतां आली असती. हिंदी कपाशीचा धागा अत्यंत आखूड असतो आणि चांगलें कापड विणण्यास तर लांब धाग्याचा कापूस लागतो. सक्कर धरणाखालील उत्कृष्ट कपाशीचा धागा १३⁄६ इंचांपेक्षां लांब नसतो; उलट विदेशी कपाशीचा धागा २१⁄४ इंच लांबहि मिळूं शकतो. सहाजीकच, चांगलें कापड तयार करावयाचें म्हटल्यास लांब धाग्याचा म्हणजे विदेशी कापूस गिरण्यांस घेणें भाग पडतें. हिंदी कपाशीचा दर्जा सुधारल्याखेरीज ही परिस्थिति पालटणार नाहीं. चांगल्या दर्जाच्या कपाशीची लागवड हिंदुस्थानांत वाढविण्याचा यत्न सरकारी प्रोत्साहनानें चालू आहे; तथापि, ह्याबाबत जास्त जोमानें खटपट होणें आवश्यक आहे. कपास कापडाच्या धंद्याची प्रगति आणि हिंदी कपाशीचें उत्पादन आणि उठाव ह्यांची सांगड बसल्याविना कपास पिकविणाऱ्या शेतकऱ्यांस चांगला भाव येणार नाहीं आणि त्यांची स्थिति सुधारण्यास सहाय मिळणार नाहीं. परदेशांतील जात चाललेल्या गिऱ्हाइकांवर ह्यापुढें अवलंबून रहाणें हिंदी कपाशीस धोक्याचें आहे; परिस्थितीस अनुसरून पिकांत सुधारणा आणि उत्पादनाचें नियंत्रण हीं घडवून आणणें अत्यंत आवश्यक आहे.

## लोकसंख्या वाढविण्याचे पद्धतशीर प्रयत्न

जर्मनीमध्यें लोकांच्या राहणीचें मान कायम टिकविण्याचा यत्न तेथील सरकार एका बाजूनें करीत असतांनाच दुसऱ्या बाजूनें लोकसंख्या वाढविण्याचीहि तें खटपट करीत आहे. इटलीमध्येंहि अशाच प्रकारचें सकृद्दर्शनीं परस्परविरोधी धोरण अंमलांत आहे. राष्ट्रीय संपत्तीमधील वाटेकरी वाढले, तर प्रत्येकाची वाटणी कमी होईल, हें उघड दिसत असूनहि लोकसंख्या मोठी करण्याचा यत्न ह्या देशांतून करण्यांत येतो ह्याचें कारण आर्थिक स्वरूपाचें नसून तें जास्त व्यापक राष्ट्रीय स्वरूपाचें आहे. आपलें सामर्थ्य वाढवून स्वतःचें इतरांवरील आक्रमण समर्थनीय ठरविण्याची वरील राष्ट्रांच्या सर्वाधिकाऱ्यांची इच्छा, हेंच लोकसंख्येच्या संवर्धनाचें मूळ आहे. स्त्रियांची पुरुषांशीं नोकरीचे बाबतात अनिष्ट स्पर्धा होऊं नये आणि स्त्रियांनीं आपल्या नैसर्गिक कार्याकडे म्हणजे मातृपदाकडे लक्ष पुरवावें ह्या हेतूनें, ज्या स्त्रिया नोकरी सोडून विवाहबद्ध होतात त्यांस सुमारें एक हजार रुपये कर्ज सरकारांतून मिळण्याची जर्मनींत व्यवस्था आहे. पहिल्या अपत्यानंतर हें कर्ज कमी करण्यांत येतें आणि दहा वर्षांत चार अपत्यें झाल्यास, विवाहबद्ध कुटुंबास कर्जफेडीची अजीबात माफी मिळते. सरकारी कर्जाचे मदतीनें लग्न केलेल्या दांपत्यांस अशा रीतीनें आजवर ७३⁄४ लक्ष मुलें झालेलीं आहेत. कर्जाची सरासरी ५०० रुपये पडते. म्हणजे, ५०० रुपये खर्च केल्यानें जर्मन राष्ट्राची लोकसंख्या एकानें वाढते आणि त्याबरोबरच बेकारीहि कमी होते, असा अर्थ झाला. अविवाहितांवर जर्मनीनें जबर इनकमटॅक्स बसविलेला असून पांचापेक्षा अधिक संतति असणारांस तो अजिबात माफ आहे. गरीब कुटुंबांसहि संतति वाढवितां यावी, ह्यासाठीं प्रत्येक मुलामागणिक त्यांस बोनस मिळतें. इतरहि अनेक अप्रत्यक्ष मार्गांनीं लोकसंख्येच्या वाढीचें महत्व नागरिकांचे मनांवर ठसविलें जातें. सामर्थ्यवान तरुण पिढी निर्माण करून आपल्या राष्ट्राचा दरारा वाढविण्याचा हा प्रयत्न आहे. इटलीनें आणि जर्मनीनें ह्या पाठबळावरच आपल्या राष्ट्राच्या वैभवाचा दिखाऊ डोलारा उभारला आहे.

## खाण्याच्या पदार्थांत भेसळ

माल शक्य तितका स्वस्त विकत मिळावा अशी सामान्य माणसाची स्वाभाविक इच्छा असते. ह्याच्या उलट, आपणांस मालाची अधिकांत अधिक किंमत मिळावी असा विकणाराचा प्रयत्न असतो. मालाचा चांगलेपणा टिकवून तो स्वस्त देणें विक्रेत्यांस परवडत नाहीं. परस्परांमधील स्पर्धेमुळें किंमत कमी करून त्यांस गिऱ्हाइक आकर्षावें लागतें. त्याच्या नांवाप्रमाणें माल बरा असेल ह्या कल्पनेनें लोक बाजारभावानें माल खरेदी करतात. माल स्वस्त विकणें परवडावें म्हणून त्यांत हलक्या पदार्थांची भेसळ करण्याचा मोह विकणारास होतो आणि ती खरेदीदाराच्या सहज लक्षांत येत नाहीं. भेसळ इतक्या कल्पकतेनें केली जाते कीं, आपणांस चांगला माल स्वस्त मिळाला ह्या विषयींच्या समाधानांत गिऱ्हाइकें गर्क असतात आणि आपल्या गळ्यांत वाईट माल बांधला गेला आहे, हें त्यांस उमगत नाहीं. खाण्याच्या पदार्थांत भेसळ करणें हा गुन्हा असून दूध, लोणी आणि तूप ह्यांत पाणी, पीठ वगैरे जिन्नस मिसळून ते विकल्याबद्दल मुंबईस दर महिन्यास होणारे खटले आणि शिक्षा ह्यांच्या याद्या प्रसिद्ध होतात, त्यांवरून सदरहु अनिष्ट प्रकार किती मोठ्या प्रमाणावर चालतो, हें दिसून येतें. भेसळीचे खाण्याचे जिन्नस जनतेच्या प्रकृतीस अपायकारक होतात हें सांगावयास नको. वरील जिन्नसांत पंचवीस ते पाऊणशे टक्के भेसळ असते, असें आढळून आलें आहे. मुंबई कार्पोरेशनच्या सभेंत नुकतीच ह्या विषयाची चर्चा होऊन भेसळ बंद होण्यासाठीं कडक उपाय अंमलांत आणण्याची आवश्यकता प्रतिपादण्यांत आली. सर्व स्थानिक संस्थांनीं ह्या बाबतींत विशेष लक्ष घालून सार्वजनिक आरोग्याचें रक्षण करणें अगत्याचें आहे.

## म्हैसूर संस्थानांतील सहकारी चळवळ

म्हैसूर संस्थानांतील सहकारी सोसायट्यांचे कारभाराविषयीं चौकशी करण्याकरितां म्हैसूर सरकारनें एक कमिटी नेमली होती,

तिच्या शिफारशींस अनुसरून सरकार पायरीपायरीनें सुधारणांच्या योजना हातीं घेत आहे. सहकारी सोसायट्यांचें ऑडिट आणि त्यांचे वरील देखरेख ह्या संबंधीं सरकारनें आतां हुकूम सोडले आहेत. ऑडिटरांनीं केवळ कायद्याच्या आणि नियमांच्या आकुंचित क्षेत्रापुरतीच आपली चौकशी मर्यादित न करतां सोसायट्यांच्या सर्वसाधारण परिस्थितीचाहि त्यांनीं विचार करणें आवश्यक आहे असें सरकारचें मत आहे. हिशेबतपासणीचें काम सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारचे हुकमतीखालीच चालले पाहिजे; पांच हजारांपेक्षां जास्त भांडवल असणाऱ्या सोसायट्यांची तपासणी रजिस्ट्रारनें मंजूर केलेल्या लायक ऑडिटरांमार्फतच झाली पाहिजे; सोसायट्यांची देवघेव, स्वतःचें भांडवल आणि त्यांस झालेला निवळ नफा ह्यांच्या कमीज्यास्त प्रमाणावर रजिस्ट्रारनें ऑडिटरांचें वेतन निश्चित करावें; एकाच सोसायटीचें ऑडिट एकाच इसमामार्फत ओळीनें दोन वर्षांपेक्षां अधिक काळ होऊं नये; इत्यादि शिफारसींची अंमलबजावणी तात्काळ व्हावयाची असून त्याप्रमाणें हुकूम सुटले आहेत. वार्षिक ऑडिटबरोबरच रोजची अगर निदान साप्ताहिक अंतर्गत हिशेबतपासणी करवणें ज्या सोसायट्यांस परवडेल, त्या सर्वांवर ती बंधनकारक करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. पैशाची अफरातफर किंवा नुकसानी ह्यांस सोसायट्यांचे माजी चालक व व्यवस्थापक कारणीभूत असल्याचें आढळून आलें, तर त्यांस ह्यापुढें त्याबद्दल जबाबदार धरण्यांत यावयाचें आहे. सहकाराचीं तत्त्वें शिकविणारी एक शाळा उघडण्याचाहि म्हैसूर सरकारचा विचार आहे. सहकारी सोसायट्यांचा कारभार चोख आणि कार्यक्षम होण्यास वरील सुधारणांचा उपयोग होईल, ह्यांत संशय नाहीं.

---

## औषधें पुरवणारी ब्रिटिश कंपनी

बूट्स प्युअर ड्रग कंपनी ह्या नांवाच्या औषधें बनवणाऱ्या जगप्रसिद्ध मंडळीच्या स्थापनेस नुकतींच पन्नास वर्षे पुरीं झालीं. ह्या धंद्याचा संस्थापक एका औषधाच्या दुकानांत नोकर होता. कंपनीच्या आतां बाराशे शाखा असून तिच्या व्यवहारांत वीस हजारांचे वर लोक नोकरीस आहेत. ह्या कंपनीस गेल्या वर्षी सुमारें सव्वा कोटि रुपये इतका नफा झाला. हिंदुस्थान, ब्रह्मदेश मलाया व सयाम ह्या देशांत कंपनीच्या औषधांचा खप वाढत्या प्रमाणावर असून इजिप्त, पॅलेस्टाइन, सीरिया ह्या देशांत तिनें अलीकडे एजन्सीज् स्थापल्या आहेत. गेल्या वर्षी कंपनीचे विक्रीचे व्यवहार सुमारें १७ कोटि झाले आणि तिनें दर आठवड्यास सरासरीनें दीड लक्ष औषधें तयार करून दिलीं! कंपनीच्या ज्युबिली समारंभाचे प्रसंगीं आरोग्य मंत्र्यांनीं कंपनीच्या कार्यास उद्देशून असे उद्गार काढले कीं गिऱ्हाइकांच्या पैशाचा योग्य मोबदला त्यांस आपल्या अनेक दुकानांमध्यें देणें आणि आपल्या नोकरांस चांगल्या रीतीनें वागवणें ही महत्त्वाची लोकहितकारक सेवा आहे. ह्या प्रकारचे उद्योग अलीकडे महाराष्ट्रांत चालू आहेत ही गोष्ट अभिनंदनीय आहे. शुद्ध आणि स्वस्त औषधें जनतेस पुरवणें ही महत्त्वाची सामाजिक कामगिरी आहे. तिचा विस्तार होणें आर्थिक प्रगतीच्या आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

---

## बॉंबे कोऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा जून, १९३८ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. "सिंध मधील सहकारी बॅंकिंगविषयीं थोडी चर्चा", "मुंबई प्रांतांतील सावकारी कायदा", "सहकारी पत आणि विमा", "सहकारामार्फत प्रौढ शिक्षणाचा प्रसार" "खंडाळा महालांतील ग्रामसुधारणा" इत्यादि वाचनीय लेख त्यांत प्रसिद्ध झाले आहेत. पुस्तक परीक्षण, ताजीं पुस्तकें, संपादकीय स्फुटें, इन्स्टिट्यूटचें कार्य, रजिस्ट्रारचीं सक्युलरें, इत्यादि नेहमींचीं सदरें अंकांत आहेत.

---

## समाज जीवन आणि राष्ट्रीय शिक्षण

[ "सह्याद्रि" मासिकाच्या ताज्या अंकामधील प्रो. बा. गो. काळे ह्यांच्या, वरील विषयावरील लेखांतून पुढील उतारा घेतला आहे. ]

सहकार, जनतेचें शिक्षण आणि लोकशाही ह्यांचा यशस्वी प्रसार डेन्मार्क देशांत जितका झाला आहे तितका दुसरीकडे कोठेंहि क्वचितच झालेला असेल. ह्या प्रगतीचा पाया शंभर वर्षांमागें बिशप ग्रुंडव्हिग ह्या धार्मिक सुधारणावाद्यानें घातला. त्याच्या शिक्षणविषयक विचारांचा डेन्मार्कच्या संस्कृतीवर आणि उन्नतीवर विलक्षण पगडा बसला. शेतकरी आणि कामकरी ह्यांच्या उन्नतीचा प्रश्न सोडवण्याची हिंदुस्थानांत सदरहू जोरानें चालली असल्यानें बिशप ग्रुंडव्हिग ह्यांच्या शिक्षणविषयींच्या कल्पनांची माहिती बोधप्रद होण्यासारखी आहे. उच्च दर्जाच्या आणि खेडेगावी शिक्षणाच्या व्यवस्थेची सुधारणा कशी करावी आणि व्यावहारिक शिक्षण बहुजन समाजास कसें द्यावें ह्या विषयीं चर्चा चालू असल्यानें ह्या माहितीचें महत्त्व विशेष वाटेल.

शंभर वर्षांमागें डेन्मार्कमधील शाळांत लॅटिन व जर्मन भाषांच्या शिक्षणाचें स्तोम होतें. ह्या शाळांस बिशप ग्रुंडव्हिगनें "मृत्युशाळा" असें तुच्छतादर्शक नांव दिलें होतें आणि त्यांच्या जागीं "जिवंतपणाच्या शाळा" स्थापण्याची त्याची मनीषा होती. डॅनिश संस्कृति जिवंत ठेवून तिला बहुमानाचें स्थान देण्याविषयीं त्याचा आग्रह होता. शिक्षण मूठभर लोकांच्या करितां असण्यास त्याचा विरोध होता. तो म्हणे:—"फारच थोडे लोक केव्हांहि पंडित आणि प्राध्यापक होणार हें उघड आहे. डॅनिश जनता सुबुद्ध व्हावी आणि तिच्यामधून राष्ट्रोपयोगी नागरिक निघावे अशा प्रकारचें शिक्षण आम्हांस हवें आहे. शाळा ही पांडित्याची पूर्वतयारी करणारी संस्था असतां कामा नये." शेतकरी आणि कामकरी ह्यांच्या कष्टाळू जीवनांत आनंद उत्पन्न करणारें शिक्षण त्यास पाहिजे होतें. डॅनिश शाळा परकीय संस्कृतीनें ग्रासलेल्या होत्या. सुशिक्षित लोकांस उद्देशून तो म्हणे:—"ह्यांचेपैकीं तीन-चतुर्थांश लोकांस डॅनिश भाषेंत लिहितां येत नाहीं.... सुधारणा म्हणजे काय ह्याची त्यांस कल्पना नसते. त्यांस इतिहास अवगत नसतो. परीक्षेकरितां घोटून तयार करण्याची रुक्ष विद्या म्हणजे प्रगति आणि उन्नति असें त्यांस वाटतें." तपशीलवार अभ्यासक्रमावर त्याचा विश्वास नसे. मनुष्यास काय शिकवावें हें समजण्यापूर्वी अगोदर त्याचा जन्म झाला पाहिजे असा एक त्याचा प्रसिद्ध उद्गार आहे. "विद्यार्थ्यांचे डोळे उघडून त्यांस मोकळेपणानें पहातां यावें, हें शिक्षणाचें मुख्य कार्य. उत्कृष्ट विचार आणि वर्तन असणारा गुरु हाच खरा शिक्षक. त्याचे विद्यार्थ्यांच्या मनांवर आणि जीवनावर वजन पडलें पाहिजे. त्यानें त्यांच्यामध्यें मिळून-मिसळून राहिलें पाहिजे आणि तो समाजासहि स्फूर्तिदायक झाला पाहिजे. सुशिक्षित आणि अशिक्षित वर्गामधलें अंतर नाहींसें करण्याचें कार्य शाळांचें आहे. जीवन आणि शिक्षण हीं एकमेकांशीं साहचर्यानें चालावीं आणि त्यांत जीवनास अग्रतेचा मान देण्यांत यावा. जनतेच्या रोजच्या जीवनाशीं शिक्षणाचा निकट संबंध असणें अगत्याचें आहे. पुढें आयुष्यांत उपयोगी पडतील अशाच गोष्टी विद्यार्थ्यांस शिकवल्या जाव्या" असा बिशप ग्रुंडव्हिगचा कटाक्ष असे.

---

### ग्रेट ब्रिटनचा सुवर्णनिधी

चलन आणि हुंडणावळ ह्यांच्या संरक्षणासाठी केलेला ग्रेटब्रिटनचा सुवर्ण संचय हळुहळु वाढत आहे. बँक ऑफ इंग्लंडच्या मालकीचें सोनें आणि हुंडणावळीच्या स्थिरतेसाठी स्वतंत्र रीतीनें संचित केलेलें सोनें असे ह्या सुवर्णनिधीचे दोन विभाग आहेत. ह्यांपैकीं दुसऱ्या निधींतल्या (एक्सचेंज ईक्कलायझेशन अकाउंट) सुवर्णसंचयाचा हिशेब मधूनमधून प्रसिद्ध करण्यांत येतो. ब्रिटिश सुवर्णनिधीच्या दोन्ही विभागांचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत.

( आकडे दशलक्ष पौंडांचे आहेत )

| | मार्च अखेर १९३७ | सप्टेंबर अखेर १९३७ | मार्च अखेर १९३८ |
|---|---|---|---|
| बँक ऑफ इंग्लंड | ५१६ | ५३७ | ५३७ |
| एक्सचेंज ईक्कलायझेशन अकाउंट | १८६ | २७९ | २९७ |
| एकूण-- | -७०२ | ८१६ | ८३४ |

वरील दोन निधींमध्यें मिळून गेल्या मार्च महिन्याचे शेवटीं सुमारें १,१०५ कोटि रुपयांचें सोनें होतें. सात पटीनें अधिक लोकसंख्या असलेल्या हिंदुस्थानांत त्या मानानें किती सोनें आहे !

---

### दुधाच्या विक्रीची पद्धतशीर व्यवस्था

दुधाच्या विक्रीची पद्धतशीर व्यवस्था होऊन त्याचा खप वाढावा आणि उत्पादकांस योग्य किंमत मिळावी ह्या हेतूनें ग्रेट ब्रिटनमध्यें सरकारनें दूध विक्रीचें बोर्ड स्थापलें आहे. त्याच्या वृत्तांतावरून असें दिसतें कीं गेल्या सालीं ६२ कोटि रुपयांचें दूध विकलें गेलें आणि त्या एका वर्षांत दुधाचा खप ५ कोटि गॅलननीं वाढला. विक्रीच्या सुधारलेल्या व्यवस्थेमुळें दुधाची किंमत थोडी वाढून उत्पादकांचा फायदा झाला. ह्या धंद्याशीं, इंग्लंड आणि वेल्समधील एक लक्ष तीस हजार शेतकऱ्यांचा संबंध येत आहे. दुधाच्या वहातुकीचा खर्च ६½ कोटि रुपये होतो. दुग्धप्राशनाचा प्रचार करणाऱ्या "नॅशनल मिल्क पब्लिसिटी कौंसिल" ह्या संस्थेच्या खटपटीस यश येत आहे. इंग्लंड आणि वेल्समध्यें गेल्या तीन वर्षांत दुधाचा खप ६ कोटि गॅलननीं वाढला.

---

### असि. रजिस्ट्रार (धुळें) यांचा शिंदखेडें तालुक्यांतील दौरा

असि. रजिस्ट्रार को. सो. खानदेश विभाग धुळें यांनीं शिंदखेडें तालुक्यांत ता. ५-७-३८ ते ता. ९-७-३८ पर्यंत दौरा काढून एकूण १५ संस्थांना निरनिराळ्या केंद्रांस भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणीं त्यांनीं सभासदांना शेतकऱ्यांच्या सद्यःस्थितीची जाणीव योग्य प्रकारें करून देऊन त्यांतून पार पडण्यासाठी शेतकऱ्यानें कोणकोणत्या दिशेनें सुधारणा करणें अवश्य आहे, तसेंच शेतकऱ्याचे सर्वांगीण उन्नतीसाठी 'सहकारी खरेदी विक्री संघ' ही संस्था किती उपयुक्त आहे याबाबत अत्यंत कळकळीचा उपदेश केला.

---

### रबरी ठोकळ्यांचे रस्ते

रबराच्या ठोकळ्यांचे रस्ते केले असतां ते सोयीचे आणि टिकाऊ होतात. त्यांस बांधणीचा खर्च मात्र फार येतो. तथापि, ते अनेक वर्षे काम देत असल्यानें हा खर्च शेवटीं निघून येतो. रबरी रस्त्यांचे बाबतींत कांहीं दोष आढळत असल्यानें त्यांचे संबंधांत प्रयोग करण्यांत येत आहेत. त्यांचा अनुभव समाधानकारक असल्याचें सांगतात.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०५,५०,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद—स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता—बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ).

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.

---

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

---

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## गव्हाच्या पोह्यांचा प्रसार

### श्री. सहस्रबुद्धे ह्यांची कल्पकता

एक अगदी नवीन धंदा, पुरेपूर १०० टक्के स्वदेशी धंदा, इतकेंच काय पण उभ्या हिंदुस्थानांत जो एकमेव अशा यथार्थ नांवानें वर्णन करतां येईल असा धनोत्पादक धंदा म्हणजेच श्री. भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे ह्यांनीं परिश्रमानें, कल्पकतेनें आणि चिकाटीनें चालविलेला गव्हाच्या पोह्यांचा कारखाना होय. ह्या धंद्याची पूर्ण कल्पना अद्यापि महाराष्ट्रास आलेली दिसत नाहीं. गव्हाचे पोहे म्हणजे भातांच्या पोह्यांसारखे असतील अशीच सर्वत्र समजूत आहे. पण वस्तुतः गव्हाचे पोहे हा एक अगदी वेगळा पदार्थ आहे.

युरोपांत औद्योगिक क्रांति होऊन जो यंत्रांचा व धंद्यांचा मनु अवतरला त्यायोगें देशाच्या आर्थिक जीवनाची उलटापालट झाली. प्रारंभीं यंत्रांचेमुळें हस्तव्यवसाय लुळे पडत चालल्यानें जनतेला यंत्र हीही एक आपत्ति वाटूं लागली. परंतु यांत्रिक जीवनाची घडी एकवार बसल्यानंतर त्याच यंत्रांनीं मनुष्याचें जीवित कसें सुखावह झालें हें ज्यांना उमगलें त्यांनीं यंत्रांच्या जोरावर जगाची बाजारपेठ काबीज करण्याचा चंग बांधला, आणि आज जगांत सुसंपन्न लोक म्हणून त्यांजकडे आपणच बोट दाखवूं लागलों आहों.

हें कसें तें समजण्यासाठी आपण सायकलीचें उदाहरण घेऊं. वास्तविक सायकलीस लागणाऱ्या लोखंडाची आपण किंमत केल्यास ती चारदोन रुपयेहि भरणार नाहीं. पण लोखंडाला परिसाचा स्पर्श होतांच जसें त्याचें सोनें व्हावें त्याप्रमाणें मनुष्याच्या कल्पकतेनें लोखंड हातीं धरून त्याला मूळ किंमतीपेक्षा शतपटीनें बाजारांत मूल्यवान बनविलें म्हणजे चारदोन रुपयांच्या कच्च्या मालाची किंमत शंभर रुपयांवर आणून ठेवली. कच्च्या मालाकरितां खर्चिलेला पैसा आणि त्याचा पक्का माल करून आलेली किंमत ह्याची वजाबाकी करून जी रकम राहील ती कल्पकतेची मजुरी समजली पाहिजे.

पाश्चात्य देश भौतिक सुधारणेच्या कळसाला पोंचले असें आपण म्हणतों त्याचें हें गणित वरील प्रकारचें आहे. चार पैशाच्या कापसाचें पिंजून-कातून-विणून-रंगवून काढलेलें वस्त्र आपण ४ रुपये देऊन अंगाखांद्यावर घालतों, हा रोजचा व्यवहार आहे. हें खरें धनोत्पादन होय. कच्च्या मालाच्या किंमतीपेक्षा शेंकडो पटीनें अधिक किंमतीचा माल तयार करणें हें धनोत्पादक धंद्याचें बीज आहे.

ह्या दृष्टीनें पाहतां गव्हाच्या पोह्यांचें धनोत्पादक धंदा ह्याच शब्दांनीं वर्णन केलें पाहिजे. गव्हाचें एक पोतें हा कच्चा माल धरल्यास पोह्यांची पंचवीस पोतीं निर्माण होतात. हें केवळ संख्येच्या दृष्टीनें झालें. पण मूल्याच्या दृष्टीनें तर ही तफावत किती तरी अधिक ताणून दाखवितां येईल. असो.

धंद्याची कल्पना डोक्यांत येऊन ती प्रयोगावस्थेंतून प्रत्यक्ष सिद्ध करीपर्यंत श्री. सहस्रबुद्धे ह्यांना कसकसे प्रयास पडले ह्याची हकीकत "अर्थ"च्या वाचकांना माहीत आहेच. कल्पना सिद्ध झाली आणि बाजारांत पोहे विक्रीस ठेवल्यानंतर ते कसे खपतील ही प्रारंभींची विवंचना अल्पावधींतच दूर होऊन पोह्यांना मागणी येऊं लागली. अगदी चोखंदळ लोकांनींही पोह्यांचा दर्जा एकजिनसी व चांगला राखल्याचें पत्रानें आणि प्रत्यक्ष भेटींत श्री. सहस्रबुद्धे ह्यांना कळविलें. पण ही पहिली कौतुकाची लाट ओसरून गेल्यानंतर पोहे गिऱ्हाइकाला पुरविणें म्हणजे तेवढ्या प्रमाणांत माल तयार करणें ही जबाबदारी ओघानेंच आली. जवळ असलेल्या भांडवलांत मागणी पुरवितां येणार नाहीं अशीं चिन्हें दिसतांच श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं अधिक भांडवल उभारून ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. असें आपल्या कारखान्याचें रूपांतर केलें.

ह्या अधिक भांडवलाच्या जोरावर पूर्वीपेक्षा दसपट माल अधिक पैदा करतां येईल इतक्या यंत्रसामुग्रीची सिद्धता झाली. पण त्याबरोबरच श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं हिंदी बाजारपेठेबरोबरच परदेशची बाजारपेठ काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा धरली. आज पोह्यांना हिंदी बाजारांत गिऱ्हाईक वाढतें आहे हें निर्विवादपणें ठरल्यानंतर आणि मागणीप्रमाणें पैदास करतां येईल इतकी तयारी झाल्यानंतर महत्त्वाकांक्षी कारखानदारांस अनायासें सुचणारा मार्ग श्री. सहस्रबुद्धे ह्यांना सुचला हें ठीक झालें. परंतु परदेशी बाजारांत पाऊल ठेवावयाचें म्हणजे परदेशी व्यापाऱ्यांची मनधरणी व ते मागतील ती दलाली देण्याची तयारी असल्याखेरीज शक्य नाहीं. ह्या दोन बाबी अशा आहेत कीं धंदेवाल्यानें ताक प्यावें व व्यापाऱ्यांनीं लोणी खावें असा प्रकार झाला असता. ही घोंड टाळण्यासाठी श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं कल्पकतेपोटीं निर्माण झालेल्या धाडसाचा उपयोग केला आणि लंडन येथें विक्रयप्रतिनिधि पाठविण्याचा बेत केला.

पण ह्या त्यांच्या बेताप्रमाणें योग्य असा महाराष्ट्रीय माणूस मिळणें कठीण वाटूं लागलें. कारण उद्योगधंद्याच्या निमित्तानें परदेशीं जाणारा महाराष्ट्रीय उंबराच्या फुलासारखा, त्यांतून येथें पैदा होणारी एखादी वस्तु परदेशांत खपविणें ही गोष्ट तर त्याहून कठीण. परंतु सुदैवानें मे. पी. डी. ब्रदर्स या स्टेशनरी दुकानाचे एक चालक श्री. अनंत श्रीधर जोशी हे हा पेशा पत्करण्यास पुढें आले. लंडनच्या बाजारांत गव्हाचे पोहे खपविण्याच्या ईर्षेनें श्री. जोशी हे गेल्या महिन्यांत इंग्लंडला रवाना झाले आहेत.

### औंध संस्थान मध्यवर्ती बँकेची नवीन शाखा

औंध संस्थान मध्यवर्ती बँकेनें एक नवीन शाखा ओगलेवाडी येथें ता. १६।७।३८ पासून सुरू केली. तिचा उद्घाटनसमारंभ श्री. गुरुनाथ प्रभाकर ओगले यांचे हस्तें ता. १६।७।३८ रोजीं करणेंत आला; त्यावेळीं ओगले ग्लास वर्क्समधील कामगार व अधिकारी वर्ग, मेसर्स औंध सोप वर्क्स व मेसर्स डी. एन. म्हैसकर अँ. को. मधील मंडळी, कराड स्टेशनवरील व्यापारी मंडळी व बँकेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन मे. ल. का. किर्लोस्कर व डायरेक्टर रा. मं. जि. रेगे वगैरे मंडळी हजर होती. श्री. रं. ना. तांबे, ऑडिटर को. सोसायटीज सं. औंध यांनीं बँकेसंबंधीं माहिती व नवीन उघडणेंत येणाऱ्या शाखेंत कोणकोणतीं कामें केलीं जातील याची माहिती जमलेल्या लोकांस करून दिली. नंतर हारतुरे, अल्पाहार झाल्यानंतर आभारप्रदर्शन रा. घोटीकर, एजंट ओगलेवाडी शाखा, यांनीं केलेनंतर हा समारंभ पुरा झाला.

### लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें

सर कुंवार जगदीश प्रसाद, व्हॉइसरॉयांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे एज्युकेशन मेंबर, यांनीं लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें या संस्थेस ता. २६-७-३८ रोजीं भेट दिली. सर जगदीश प्रसाद यांनीं संग्रहालय एक तास पाहिला. संग्रहालय पाहून त्यांचे मनावर या संस्थेबद्दल अनुकूल परिणाम झालेला दिसला.

## झारापकर टेलरिंग अँड कटिंग कॉलेज

### पुणें व दादर येथील एक उपयुक्त औद्योगिक संस्था

आपल्या महाराष्ट्रांत अत्यंत अल्पावधींत भरभराटीला आलेल्या ज्या कांहीं थोड्या संस्था आहेत त्यांत पुणें येथील झारापकर टेलरिंग कॉलेजचा प्रामुख्यानें उल्लेख करावयास हरकत नाहीं. ही संस्था पुणें येथें झारापकर बंधूंनीं सन १९३३ मध्यें स्थापन केली. मध्यम वर्गांतील लोकांना अल्प खर्चांत व अल्प मुदतींत शिवणकलेचें सशास्त्र शिक्षण मिळावें हा ही संस्था काढण्यांत चालकांचा हेतु होता. संस्थेंतील शिक्षणाची उत्कृष्ट पद्धति, सुंदर व्यवस्था व विद्यार्थ्यांविषयीं कळकळ यामुळें सुरवातीपासूनच विद्यार्थ्यांची संख्या एकसारखी वाढूं लागली व आज ह्या संस्थेमध्यें १५० हून जास्त विद्यार्थी आहेत हें संस्थेला खरोखर भूषणावह आहे. संस्थेचे सर्व चालक व शिक्षक ह्यांनीं ह्या कलेंत अत्यंत प्राविण्य संपादन केलें असून मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याकडून पहिल्या वर्गाचीं प्रशस्तीपत्रकें मिळविलीं आहेत. लंडन येथील टेलर अँड कटर ॲकॅडेमीकडून उच्च दर्जाचे डिप्लोमाहि त्यांनीं मिळविले आहेत. ह्या संस्थेचे व्हाइस प्रिन्सिपॉल श्री. गोविंदराव झारापकर व जनरल मॅनेजर श्री. तु. वि. कदम यांनीं इंग्लंडला जाऊन ह्या कलेचें पाश्चिमात्य देशांतील प्रत्यक्ष शिक्षण मिळविलें आहे. ह्या कॉलेजमधील शिक्षणपद्धति इतकी उत्कृष्ट आहे कीं आतांपर्यंत या कॉलेजमधून सरकारी परीक्षेला किंवा लंडनच्या परीक्षेला जे जे विद्यार्थी बसले त्यांतील एकही विद्यार्थी नापास झालेला नाहीं. अखिल हिंदुस्थानांत हें श्रेय फक्त ह्याच कॉलेजनें मिळविलें आहे याबद्दल कॉलेजच्या चालकांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे. ह्या कॉलेजला मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यानें मान्यता दिली असून कॉलेजची परीक्षा त्या खात्याकडून घेण्यांत येते व यशस्वी विद्यार्थ्यांना सरकारी प्रशस्तीपत्रकें देण्यांत येतात. ह्या कॉलेजला पुणें येथें भरलेल्या अखिल भारतीय औद्योगिक प्रदर्शनांत पहिल्या वर्गाचें सर्टिफिकेट व सुवर्णपदक कॉलेजमधील उत्कृष्ट शिक्षणपद्धतीबद्दल देण्यांत आलें आहे. कॉलेजच्या चालकांनीं ह्या कॉलेजचा फायदा मुंबई व उपनगर येथील विद्यार्थ्यांना घेतां यावा म्हणून ता. १ एप्रिल, १९३८ पासून दादर येथें एक नवीन कॉलेज उघडलें असून तेंही उत्तम रीतीनें चाललेलें आहे. या कॉलेजमध्यें हिंदुस्थानांतील सर्व भागांतून विद्यार्थी येतात, इतकेंच नव्हे तर आफ्रिका, इराण इत्यादि देशांतूनही येथें विद्यार्थी येऊन त्यांनीं ह्या संस्थेचा फायदा घेतलेला आहे. यावरून अल्पावधींतच या कॉलेजमधील उत्कृष्ट शिक्षणाची कीर्ति किती दूरवर पसरली आहे हें दिसून येईल. या कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. काशिनाथराव झारापकर यांना श्रीमत् शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनीं शिवणकलाकुशल अशी पदवी दिली असून औंधच्या राजेसाहेबांनीं सुवर्णपदक दिलें आहे. ह्या संस्थेचे जनरल मॅनेजर श्री. कदम यांना क्षात्रजगद्गुरूंनीं शिवणकलाभूषण अशी पदवी दिली आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कॉलेजच्या चालकांनीं कॉलेजला फार थोड्या अवधींत हिंदुस्थानामध्यें ह्या क्षेत्रांतील संस्थांत पहिल्या प्रतीचें स्थान मिळवून दिलें असून आपल्या देशांतील हजारों तरुणांना चरितार्थाचें एक स्वतंत्र साधन मिळवून देऊन त्यांना स्वावलंबी करण्याचें श्रेय घेतलें आहे. ही संस्था बेकारी निवारणाचें उपयुक्त कार्य करीत आहे. या संस्थेची भरभराट होत जाऊन दिवसानुदिवस असाच उत्कर्ष होत जावो असें आम्ही इच्छितों.



प्रिन्सिपॉल काशिनाथराव झारापकर

### हिंदुस्थान सरकारच्या कस्टम्सच्या उत्पन्नांत घट

चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींतील हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें (आयात-निर्गत जकातींचें) उत्पन्न गेल्या वर्षाच्या तत्सम मुदतीमधील उत्पन्नाचे मानानें कसें कमी झालेलें आहे, हें खालील आकड्यांवरून दिसून येईल.

हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

| | १९३७ | १९३८ |
|---|---|---|
| | लक्ष रु. | लक्ष रु. |
| एप्रिल | ३,६० | ३,१४ |
| मे | ३,५८ | ३,२२ |
| जून | ३,७२ | २,९३ |
| पहिली तिमाही | १०,९० | ९,२९ |

अंतर्गत उत्पादनावरील एक्साइज पट्टीच्या उत्पन्नांतहि घट झालेली आढळते. १९३७ च्या पहिल्या तिमाहीमधील उत्पन्न २ कोटि, ६५ लक्ष रुपये होतें. चालू सालच्या पहिल्या तिमाहींत फक्त २ कोटि, २९ लक्ष रुपये जमा झाले. साखरेवरील एक्साइजचें उत्पन्न मात्र १८ लक्ष रुपयांनीं वाढलें, तें १ कोटि, १८ लक्ष रुपये झालें.

ब्रिटिश कापडाची आयात घटली; तथापि ब्रिटिशेतर कापड ज्यास्त प्रमाणांत हिंदुस्थानांत उतरलें, त्यामुळें ब्रिटिश कापडावरील जकातीपासून मागील वर्षी ३८ लक्ष रुपये उत्पन्न मिळालें होतें तें ८ लाखांनीं घटलें; उलट, ब्रिटिशेतर कापडानें ३९ लाखांचे ऐवजीं ५३ लक्ष रुपये जकात भरली.

मद्यांची आयातहि गेल्या तिमाहींत उतरली. त्यांच्या जकातीच्या उत्पन्नांत ८ लक्ष रुपयांची घट होऊन ३० लक्ष रुपयेच सरकारास मिळाले.

### श्री. बालाजी महोत्सव, नाशिक

नाशिक बालाजी संस्थानतर्फे श्री. बालाजीचा उत्सव आश्विन शुद्ध १ ते १५ (सप्टेंबर २४ ते ऑक्टोबर ९) पर्यंत होईल, त्यावेळीं स्वदेशी लहान उद्योगधंद्यांचें, गुळांच्या कुंड्यांचें आणि कलेचें प्रदर्शन भरविण्यांत येईल. कागदी फुलें करण्याचें प्रात्यक्षिकहि ठेवण्यांत येईल.

## सहकारी चळवळ

### औंध स्टेट एग्रीकल्चरिस्ट्स को. क्रे. सोसायटी लि. औंध
( वार्षिक सभा : २९-७-३८ )

वरील सोसायटीचा, ३०-६-३८ असेर संपलेल्या चवथ्या वर्षाचा अहवाल आमचेकडे आला आहे. गेल्या वर्षी तिच्या पटावर ८० सभासद होते. अहवालाचे साली त्यांची संख्या १२० झाली. माग भांडवलहि ८६० रुपयांचें २,००० रुपये झालें. नोकरांची प्रवृत्ति सभासद होण्याकडे वाढत्या प्रमाणावर असल्याचें दिसून येतें. अहवालाचे सालीं एकूण कर्जवांटणी सुमारें ५ हजारांची झाली. बहुतेक सर्व सभासदांकडून वेळचे वेळीं कर्ज व वर्गणी वसूल होते असा अहवालांत उल्लेख आहे. अहवालाचे वर्षी सोसायटीस ८१ रु. ४ आ. ९ पै नफा झाला, त्यांतून सभासदांस ४ टक्के दरानें डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें. सोसायटीनें अल्पावधींत केलेली प्रगति प्रशंसनीय असून, नियमित व वेळचे वेळीं हप्ता आणि वर्गणी देणारांचीच नांवें कायम ठेवण्याचें कार्यकारी मंडळाचें धोरण अनुकरणीय आहे.

### पुरंदर तालुका शेतकी-सुधारणा संघ, सासवड

वरील संस्थेचा १९३७-३८ असेरचा १० वा वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. शेतकरी वर्गाची आर्थिक, सामाजिक, औद्योगिक आणि शैक्षणिक उन्नति घडवून आणण्याचा यत्न करणें हें संस्थेचें उद्दिष्ट आहे. सुधारलेल्या जातींच्या पिकांचा प्रसार करणें, रोगप्रतिबंधक उपाययोजना करणें, उत्तम देशी व विदेशी भाजीपाल्यांचा आणि बियाणांचा प्रसार करणें, लोखंडी नांगर व औतें ह्यांचें महत्त्व पटवून देणें, शेतीविषयक ज्ञान फैलावणें, इत्यादि मार्गांनीं संस्था आपलें कार्य करीत असते. पुरंदर तालुक्यांत फळझाडांची लागवड वाढत आहे, त्या दृष्टीनें संस्था शेतकऱ्यांस उपयुक्त सल्ला देत आहे. सासवड येथील गोखले डेअरी लि. ची बरीच प्रगति झाली आहे. संघाच्या पुस्तकालयांत शेतकीचीं उपयुक्त पुस्तकें आणि हस्तपत्रकें ठेवलेलीं आहेत. शेतकी सुधारणा संघास अत्यंत विस्तृत कार्यक्षेत्र मोकळें आहे. तेव्हां शेतकरी समाजानें संघाच्या कार्यांत लक्ष घालून संघाकडून सेवा करून घ्यावी.

### कळवण सहकारीवृत्त

कळवण तालुका सहकारी औतें, खतें, बीं, पुरविणाऱ्या सोसायटीची पहिली साधारण सभा तारीख ५।६।३८ रोजीं कळवण येथें दुपारीं दोन वाजतां कळवण तालुक्याचे फडणवीस श्री. माळी यांचे अध्यक्षतेखालीं भरली. सभेस सोसायटीचे प्रतिनिधी व सभासद मिळून बराच मोठा शेतकऱ्यांचा समुदाय जमला होता.

सभेच्या सुरवातीस कळवण यूनिअनचे सुपरवायझर यांनीं नवीन स्थापन झालेल्या इम्प्लिमेंट सोसायटीचे उद्देश, घटना व कार्य याबद्दल माहिती सांगितल्यावर रजिस्ट्रारसाहेब यांचेकडून मंजूर होऊन आलेले पोट-नियम वाचून दाखविले व ते सभेंत मंजूर करण्यांत आले.

सोसायटीनें आपल्या विविध कार्यक्रमांत औतें, खतें, बीं यांची विक्री करण्याकरितां व भाड्यानें देण्याकरितां खालील साधनांचा पुरवठा करण्याचें ठरविलें आहे. (१) नांगर (२) अमोनियम सल्फेट, कोळपीं, (३) पुसा नंबर ४ चें गव्हाचें बीं, (५) भाजीपाल्याचें बीं, (६) कपाशीचें बीं, (७) बटाट्याचें बेणें.

याचप्रसंगीं येथील बँक इन्स्पेक्टर यांनीं या सोसायटीपासून मिळवितां येण्यासारखे फायदे यावर उपदेशपर भाषण केलें.


**६ टक्के मासिक आंवक ठेव**

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड, पुणें.**

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

**दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड**
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२/अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. ॲम् स्टेशन) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, ॲम. अल. सी.
मॅ. डिरेक्टर : अेस. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटींवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.
एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

## निवडक बाजारभाव

**बँक रेट** ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) 3%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११८—३ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन | १०३—७ |
| ४% १९४३ | १०८-१० |
| ३½% बिनमुदत | ९९-३½ |
| ३½% १९४७-५० | १०६—६ |
| २¾% १९४८-५२ | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९-१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९-१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२४—४ |

### मंडळयांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १४०—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३१—४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५२—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११७—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९५५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७३७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | ११६—० |
| कराची ( १०० ) ९% | २१०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १९६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३७५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १६४—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४०—४ |
| शिंदा स्टीम ( १५ ) १ रु. | २०—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. | ३९—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४३४०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०१-१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १५७—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २७७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पे | १३२०—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३५-११-३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ५१-०-० |


**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

मुलामुलींकरितां नमुनेदार व उपयुक्त मासिक
**आनन्द**
**वार्षिक वर्गणी-मोठा अंक ३ रु. लहान अंक १ रु.**
जुलै १९३८ च्या खास अंकापासून ३३ वें वर्ष सुरू. वर्गणीदार होऊन हें मासिक घेऊन पाहिल्याशिवाय त्याची खरी किंमत कळणार नाहीं. दरमहा नवे नवे पण उपयुक्त व आकर्षक विषय : उठावदार व स्पष्ट चित्रें : नव्या नव्या कल्पना व नवी नवी माहिती यांनी प्रत्येक अंक सजविलेला असतो. जानेवारी १९३९ चा अंक अगदीं लहान मुलांसाठीं मोठ्या टाइपांत व आकर्षक दोन रंगांत काढणार आहोंत. जुलै १९३८ व जानेवारी १९३९ हे दोन खास अंक वरील वर्गणींतच वर्गणीदारांस मिळतील. पत्ता—**आनंद कार्यालय, पुणें २**




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे याद्रीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अत्यंतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.
किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.
**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( दि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

अप-टु-डेट शिलाई करतां

महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

रु. १४,५०० आणि त्याखेरीज नफा.

वार्षिक हप्ता रु. १७५ भरून दरमहा रु. ४१-१०-८ वीस वर्षेपर्यंत मिळून त्याखेरीज रु. ५०००।– रक्कम व नफा मिळेल. भरलेल्या हप्त्यावर शें. ९ टक्के व्याज.

एम्. कानजी ॲण्ड कंपनी, मॅनेजिंग एजन्टस् एस. सूर्यराव आणि कंपनी, महाराष्ट्राचे मुख्य एजन्टस्

धी युनिव्हर्सल फायर ॲण्ड जनरल इन्शुअरन्स कंपनी लि., लक्ष्मीरोड, पुणें.

सुप्रसिद्ध संचालक मंडळ व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

संगीत-मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा

मोती चौक : : : सातारा

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.